http://www.sgbauonline.com/



# B.A. (Part-I) Semester-I Examination

## MARATHI

## (Modern Indian Language)

वेळ—तीन तास] [एकूण गुण—80

**सूचना :**—बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहित धरल्या जातील.

1. 'ध्येयाची पराकाष्ठा' या पाठातून साने गुरुजींनी युवा पिढाला भारतीय नीतिमूल्यांची ओळख कशी करून दिली आहे. सविस्तर लिहा. 16

**किंवा**

'चालाल तर वाचाल।' या अभय बंग यांच्या पाठातून श्रमाचे व व्यायामाचे महत्व कसे सांगितले आहे ?

2. 'अन्वरशा फकीर' या पाठाच्या आधारे अन्वरशाचे व्यक्तिचित्रण करा. 16

**किंवा**

'इर्जिक' म्हणजे काय ते सांगून 'इर्जिक'चे ग्रामजीवनातील असणारे महत्व अरुण जाखडे यांनी कसे स्पष्ट केले आहे ते लिहा.

3. (अ) विठ्ठलाप्रति असलेला जिव्हाळा संत सावता माळी यांच्या अभंगातून कसा व्यक्त होतो ते लिहा. 8

**किंवा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'या झोपडीत माझ्या' या कवितेचा आशय तुमच्या शब्दांत मांडा.

(ब) 'आत्ता' या कवितेतून व्यवस्थेविरुद्ध बंड करण्याचे आवाहन कवी नामदेव ढसाळ यांनी कसे केले ते लिहा. 8

**किंवा**

'भंगार' कवितेचा आशय तुमच्या शब्दांत लिहा.

4. (अ) लेखनविषयक नियमांचा वापर करून उतारा शुद्ध करा : 8

महाराष्ट ही संतांची भूमी आहे. सतांनी केलेल्या रचना अमर आहेत. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, तूकोबांची गाथा या ग्रंथांना तोड नाही. संत नामदेवांनि. उत्तर भारतात भमन्ती केली. त्यांच्या काही रचना शिखांचा पवित्र ग्रंथ ग्रंथसाहेब' यात समाविष्ट आहेत. शरिर आणि मन या दोन्ही घटकांना शुद्ध व पावित्र्य करण्याचे सार्मथ्य सर्व संतांच्या रचनेत आहे.

**किंवा**

न्हस्व दीर्घ नियमांतील कोणत्याही चार नियमांच्या व्याख्या सांगून सोदाहरण स्पष्ट करा.

(ब) मुद्रितशोधनांच्या खुणांचा वापर करून उतारा शुद्ध करा : 8

पहाटेची वेळ होती. भोवतालचा काखळो हकूहकू ओसरत होता. पूर्व नजर दिशेला टाकली तो काय पूर्वेकडच्या डोंगराआडून हकूहकू तांबूस पिवळे सोनेरी रंग निळ्या नभात सर्वत्र उधळले जात होते. गगनातल्या लहान मोठ्या काळसर पांढऱ्या ढगांवर हे तांबूस पिवळे रंग शिंपडले जात होते म्हणा ना या दिशेच्या डोंगर कडांवर, झाडांच्या शेंड्यांवर हे तांबूस, पिवळे सोनेरी रंग विखरत होते.

**किंवा**



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

खालील मुद्रित शोधनांच्या खुणांचा अर्थ लिहा :

(1) ═

(2) ◯

(3) ≠

(4) ा

(5) ि

(6) ृ

(7) ॆ

(8) ॅ

5\. खालील बहुपर्यायी प्रश्न सोडवा : 16

(1) भगवदगीता जशी कुरुक्षेत्रात तसे ______ जीवनक्षेत्रातच दिले पाहिजे—देता येईल.

(अ) शिक्षण (ब) कर्तव्य

(क) अधिकार (ड) पैसा

(2) स्वप्नातला शब्द खरा करण्यासाठी त्याग करणारा राजा कोण ?

(अ) शिबी राजा (ब) राजा हरिश्चंद्र

(क) नळ राजा (ड) बळी राजा

(3) शोधग्रामच्या मागे किती कि.मी. अंतरावर जंगलातून एक छोटीशी नदी वाहते ?

(अ) एक (ब) दोन

(क) तीन (ड) चार

(4) आंगणाच्या कोणत्या दोन जाती मधुकर केचे सांगतात ?

(अ) श्रेष्ठ व कनिष्ठ (ब) स्त्री व पुरुष

(क) श्रीमंत व गरीब (ड) यापैकी एकही नाही

(5) विनोबांनी चक्की व चात याबरोबर आणखी कोणत्या गृहदेवतेची उपासना करावी असं सुचवलं होतं :

(अ) चूल (ब) पैसा

(क) ईश्वर (ड) श्रम

(6) वास्तविक आंगण आणि घर हे एकाच ______ अविभाज्य घटक आहेत

(अ) शहराचे (ब) गावाचे

(क) वास्तूचे (ड) श्रमाचे

(7) अन्वरशा मंतरलेलं पाणी रात्रभर कोठे ठेवण्यास सांगे ?

(अ) घरात (ब) देवापुढे

(क) तुळशीवृंदावनात (ड) अंगणात



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(8) अन्वरशा कोणत्या झाडावरील मोहोळ झाडीत नसे ?

(अ) कडूनिंब (ब) आंबा

(क) चिंच (ड) पिंपळ

(9) इथल्या शेतीचे आणि शेतीतल्या मातीचे वेगळे वैशिष्ट्य आहे. आजपर्यंत ती सम्राटाऐवजी ______ झुकत राहिली.

(अ) संतांपुढे (ब) समाजसुधारकांपुढे

(क) पुढाऱ्यांपुढे (ड) इतिहासकारांपुढे

(10) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे पूर्ण नाव लिहा.

(अ) कृष्णाजी केशव दामले (ब) ज्ञानदेव विठ्ठलपंत कुळकर्णी

(क) माणिक बंडोजी इंगळे (ड) यापैकी एकही नाही

(11) आत्ता कशासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे ?

(अ) सूर्यफुलासारखे (ब) कमळासारखे

(क) गुलाबासारखे (ड) चाफ्यासारखे

(12) लोकांनी मोटारीऐवजी काय वापरले तर व्यायाम मिळतो ?

(अ) स्कुटर (ब) बस

(क) सायकल (ड) मोटर सायकल

(13) अन्वरशाची पत्नी फावल्या वेळेत काय शिवत असे ?

(अ) कपडे (ब) वाकळ

(क) चादरी (ड) यापैकी एकही नाही

(14) केशवसुतांचे पूर्ण नाव काय आहे ?

(अ) प्रल्हाद केशव अत्रे (ब) कृष्णाजी केशव दामले

(क) कुसुमाग्रजड (ड) यापैकी एकही नाही

(15) सावता माळी हे ______ विशेष पुरस्कार करणारे संतकवी आहेत.

(अ) नामस्मरणाचा (ब) किर्तनाचा

(क) भजनाचा (ड) अभंगाचा

(16) 'भंगार' या कवितेचे कवी कोण आहेत ?

(अ) शंकर बडे (ब) नामदेव ढसाळ

(क) केशवसुत (ड) अजीम नवाज राही



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/